Samana August 14, 2011

# तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेची पुणे फेरी २३ ऑगस्ट रोजी

पुणे, दि १३ (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाची गोडी लागावी, यासाठी 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस'तर्फे 'राष्ट्रीय तंत्रज्ञान' प्रश्नमंजूषा आयोजित करण्यात आली आहे. २३ ऑगस्ट रोजी या स्पर्धेची फेरी पुण्यात होणार आहे.

कोथरूडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे ही स्पर्धा होणार आहे. आठवी ते बारावी इयत्तेतील विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेसाठी शाळांकडून कोणतेही प्रवेशशुल्क आकारण्यात येणार नाही. शाळेतर्फे एकापेक्षा अधिक संघ पाठविता येऊ शकतात, अशी माहिती स्पर्धेचे संयोजक मनप्रीत यांनी दिली.

पुण्यासह देशातील बारा प्रमुख शहरांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येणार असून, प्रत्येक शहरातील एक याप्रमाणे बारा संघांमध्ये अंतिम राष्ट्रीय स्पर्धा घेण्यात येणार आहे. डिसेंबर महिन्यात अंतिम स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना स्मृतिचिन्ह, गॅलेक्सी टॅब्लेट, आणि अत्याधुनिक डिजिटल कॅमेरा देण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी २० ऑगस्टपूर्वी टीसीएस हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे येथे प्रवेशिका पाठवाव्यात, असे आवाहन मनप्रीत यांनी केले आहे.